# मिरा भाईंदर महानगरपालिका
# माहिती व जनसंपर्क विभाग
# प्रेसनोट

- **दिनांक 30 डिसेंबर 2023 रोजी मिरा भाईंदर महानगरपालिका कार्यक्षेत्रात "डीप क्लिन ड्राईव्ह" मोहिमेत सहभागी होणार मा. ना. श्री. एकनाथजी शिंदे, मुख्यमंत्री**

मा. ना. श्री. एकनाथजी शिंदे, मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्या सेवा स्वच्छतेतुन व स्वच्छ भारत अभियान व राष्ट्रीय स्वच्छ हवा कार्यक्रम अंतर्गत "संपूर्ण स्वच्छता मोहिम" (Deep Cleanig Dirve) राबविणेत येत आहे. मिरा भाईंदर महानगरपालिका कार्यक्षेत्रात दिनांक 30 डिसेंबर 2023 रोजी सदर मोहिमेसाठी मा. ना. श्री. एकनाथजी शिंदे, मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. त्याचबरोबर शहराचे मा. आमदार श्री. प्रताप सरनाईक व मा. आमदार श्रीमती गीता जैन हे देखील उपस्थित राहणार आहेत. मा. आयुक्त तथा प्रशासक संजय श्रीपतराव काटकर (भा.प्र.से.) यांच्या मार्गदर्शनाखाली, अति. आयुक्त संभाजी पानपट्टे व उपायुक्त रवि पवार यांच्या समन्वयाने शहरात "डीप क्लीन ड्राईव्ह" ही मोहीम राबविण्यात येत आहे.

दिनांक 30 डिसेंबर 2023 रोजी नवघर नाका ते गोल्डन नेस्ट परिसरात मा. मुख्यमंत्री हे स्वत: सदर डीप क्लिन ड्राईव्ह मोहीमेत सहभागी होणार आहेत. या मोहिमेमध्ये साफसफाई, स्टीकर्स काढणे, प्लास्टिक पिशवी बंदी कारवाई, शौचालय स्वच्छ करणे, पुतळे धुणे, तुटलेली झाकणे दुरुस्ती करणे, शहरातील रस्त्यांची, दुभाजकांची, बस स्टॉपची स्वच्छता, हवेची गुणवत्ता सुधारण्यासाठी धुळीचे नियंत्रण इत्यादी कामे सकाळी 9.00 वाजल्यापासून दुपारी 2.00 वाजेपर्यंत करणेत येणार आहे. सदर "डीप क्लीन ड्राईव्ह" या मोहीमेत शहरातील नागरिकांनी सहभाग नोंदवून महापालिकेस सहकार्य करण्याचे आवाहन मा. आयुक्त तथा प्रशासक संजय श्रीपतराव काटकर (भा.प्र.से.) यांनी केले आहे.